वर्ष ४५
अंक ८

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

ऑगस्ट २०२५
श्रावण / भाद्रपद
शके १९४७

नमस्कार मंडळी

आज १ ऑगस्ट - "भारतीय असंतोषाचे जनक" अशी ज्यांची ओळख आहे, त्या लोकमान्य टिळकांची आज १०५ वी पुण्यतिथी. त्यांना अभिवादन करून या महिन्याच्या लेखाची सुरुवात करतो. १५ ऑगस्ट हा भारताचा "स्वातंत्र्य दिन". सर्व भारतीयांना येणाऱ्या 'स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा'! पाकिस्तानबरोबर नुकत्याच झालेल्या युद्धात भारतीय सैनिकांनी दाखवलेली अतुलनीय कामगिरी खूपच कौतुकास्पद आहे. या सर्वांचे, तसेच त्यांना पाठबळ देणाऱ्या सर्व भारतीयांचे अभिनंदन! भारतीय अर्थव्यवस्था अधिक मजबूत होताना दिसत आहे. 'विकसनशील भारत' हळूहळू 'विकसित भारत' बनण्याच्या मार्गावर आहे. भारताच्या या प्रयत्नांना खूप खूप शुभेच्छा! हे लिहिताना शालेय जीवनात शिकलेली "बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो" या कवितेची आठवण झाली.

१८ ऑगस्ट रोजी, वीर सेनानी पहिला बाजीराव पेशवा यांची ३२५ वी जयंती साजरी होत आहे. या शूर वीरास मानाचा मुजरा.

नुकतेच 'गर्जे मराठी'तर्फे आयोजित केलेल्या एका चर्चासत्रात, महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच माहिती तंत्रज्ञान मंत्री, ना. आशिष जी शेलार, यांच्याबरोबर संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यावेळी त्यांना बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या "गुरुपीठ" उपक्रमाबद्दल माहिती दिली. तेव्हा मंत्री महोदयांनी या विषयी लागणारी मदत करण्याचे आश्वासन दिले.

ऑगस्ट महिना हा कदाचित या वर्षातील सर्वात व्यस्त महिना असेल, कारण श्रावण व भाद्रपद हे महिने या वर्षी ऑगस्ट महिन्यात येत आहेत. त्यामुळे आपल्याला अनेक सण साजरे करायची संधी मिळणार आहे. त्याचप्रमाणे शाळा आणि महाविद्यालये पण याच काळात सुरू होत आहेत. त्यामुळे पालकांची मुलांबरोबर खरेदीसाठी पण धावपळ होणार आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना खूप खूप शुभेच्छा!

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे मराठी शाळेकडून "नव्या शैक्षणिक धोरणा"ची नुकतीच घोषणा करण्यात आली. त्यानुसार विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त इतर कार्यक्रमांमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहन देण्यात येईल आणि त्याबद्दलचे गुणही त्यांना मिळतील. विद्यार्थ्यांनी फक्त 'परीक्षार्थी' बनू नये यासाठी केलेला हा एक प्रयत्न आहे. शाळेत नियमित उपस्थित राहणे, वेळेवर गृहपाठ करणे, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेणे, आपल्या संस्कृतीबद्दल अधिक माहिती मिळवणे, वगैरे गोष्टींवरही भर देण्यात येईल.

जुलै महिन्याच्या शेवटी NAFA तर्फे 'चित्रपट महोत्सव' साजरा करण्यात आला. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या भागीदारीत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी चित्रपट सृष्टीतील अनेक मान्यवर कलाकारांनी या महोत्सवाला उपस्थिती लावली होती. पुढील वर्षी सियाटल येथे होणाऱ्या अधिवेशनात 'चित्रपट महोत्सव' करण्याचा आमचा मानस आहे. त्यात उत्तर अमेरिकेतील चित्रपट क्षेत्रातील ज्ञान असलेल्या लोकांना त्यांची कलाकृती सादर करण्याची संधी मिळेल. जर तुम्ही चित्रपट क्षेत्राशी निगडित असाल, किंवा तुमच्याकडे या विषयातील विशेष कौशल्य असेल तर आम्हाला नक्की संपर्क साधा. https://bmmonline.org/contact/

यावर्षीच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही 'युवा' उपक्रमातर्फे मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले होते. अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयात प्रशिक्षण घेतले. हे वर्ग घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे, स्वयंसेवकांचे, तसेच ज्या पालकांनी त्यांच्या मुलांना हे प्रशिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले त्या सर्व पालकांचे मी आभार मानतो.

'समाजरंग'तर्फे जाहीर करण्यात आलेल्या 'वारी' मध्ये ऑस्टिन, बे एरिया, कॅलगरी, आणि सॅन डिएगो मंडळांनी सहभाग घेऊन सामाजिक संस्थांना मदत केली. या मंडळांच्या अध्यक्षांचे तसेच तेथील सर्व देणगीदारांचे हार्दिक अभिनंदन! त्याचप्रमाणे मी सर्व मंडळाच्या अध्यक्षांना विनंती करतो की त्यांनी यावर्षी त्यांच्या मंडळाच्या गणपती समोर जमलेली दक्षिणा कोणत्याही सामाजिक संस्थेला देणगी दाखल द्यावी. 'ऑस्टिन मराठी मंडळ' गेली काही वर्षे अशी देणगी सामाजिक संस्थांना देत आहे. तरी तुम्ही सुद्धा यावर्षी या उपक्रमामध्ये सामील होऊन आम्हाला सहकार्य करा. तसेच तुमचे मंडळ इतर कोणते सामाजिक कार्य करीत असेल तरी आम्हाला कळवा आणि आम्ही तुमच्या मंडळाचे नाव वृत्ता मधून जाहीर करू.

दिवाळीनिमित्त अनेक मंडळे चांगल्या कार्यक्रमांच्या शोधात असतील. मी सर्व मंडळाच्या अध्यक्षांना आवाहन करतो की त्यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर जाऊन 'North America Programming' वर असलेले कार्यक्रम बघावे आणि अमेरिकेतील गुणी कलाकारांना आपल्या मंडळामध्ये बोलावून संधी द्यावी.

अजून बरोबर एक वर्षाने सियाटल येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन होणार आहे. श्री. मोहित चिटणीस यांच्या नेतृत्वात अनेक स्वयंसेवक एकत्र येऊन खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत, त्याचबरोबर आमच्या समितीतील सर्वजण अधिवेशनाच्या विविध समित्यांबरोबर काम करीत आहेत. या सर्वांचे मी आभार मानतो.

लेखाची सांगता करण्याआधी येणाऱ्या रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, आणि गणेशोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा!

जय हिंद - जय महाराष्ट्र! आपला,

- प्रसाद पानवळकर अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Santosh Salvi
4 Azalea Lane, Nashua, NH 03062
Ph: 603 438 9279
Email: santosh.salvi@bmmonline.org

जाहिरातींचे दर: पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
Send your payments to: zelle@bmmonline.org

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)

मताधिकार असलेले सदस्य

अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी

नियुक्त सदस्य

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

विश्वस्त समिती

अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

या अंकात

अध्यक्षीय	१
बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती	२
२०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल	३
रेशीमगाठी	४
बृ. मं. मराठी शाळा: २०२५ सालच्या परीक्षांचा वृत्तांत	४
उत्तररंग	५
लक्ष्यवेधी	७
स्वर-गणेश	७
श्रावणी हिरवळीचा मराठी मृदगंध	७
कविता:तुझा माझा पाऊस	९
कि -वेस्ट: अमेरिकेचे दक्षिण टोक !	१०
कॅल्गरी स्टॅम्पीड परेड	११
वृत्त दिवाळी अंक आवाहन	१२
मराठी शाळा - निबंध स्पर्धा	१३
कविता: पिकलं पान	१५
पुरुषोत्तम पुरस्कार	१६
श्रद्धांजली	१७
जाहिरात	१८
MANA Paintings	१९
Interim Financial Report	२०

संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :

Email - Vrutta@Bmmonline.org

आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

२०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

सगळ्यांची उन्हाळ्याची सुट्टी मस्त मजेत सुरू आहे ना? हे वृत्त तुमच्या हाती पडेल तेव्हा आपलं स्नेहसंमेलन एका वर्षावर येऊन ठेपलेलं असेल. आम्हांला तयारीला लागून एक वर्ष झालं सुद्धा! आता आमच्या सर्वच समित्यांची कामं एकदम जोषात सुरू आहेत. हे वृत्त उन्हाळ्याच्या सुट्टीतही तुम्हांला काही गोष्टींची आठवण करून देण्यासाठी आणि नवीन घडामोडी तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचा एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे B-Connect. हे व्यासपीठ भारत आणि उत्तर अमेरिकेतील व्यावसायिकांना आणि व्यवसाय करण्याविषयी उत्सुकता आणि आस्था असणाऱ्या सर्वांना एकत्र आणते. आपल्या संमेलनात B-Connect ह्या उपक्रमाअंतर्गत खास कार्यक्रम असणार आहेत. तुम्ही व्यावसायिक असाल, व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल किंवा केवळ माहिती घेण्यासाठी उत्सुक असाल तर B-Connect च्या कार्यक्रमांना नक्की उपस्थित रहा! नवीन विषयांची ओळख, नवीन कल्पना, अनुभवी मार्गदर्शक किंवा नवीन मित्रमंडळी अशा बऱ्याच गोष्टी ह्या माध्यमातून तुम्हांला मिळू शकतील. तुम्हांला तुमच्या व्यवसायाची जाहिरात करायची असेल तर तुम्ही प्रायोजकाच्या भूमिकेतही शिरू शकता. अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या bmmseattle2026.org/bconnect/ आणि B-Connect संबंधीच्या कुठल्याही शंका किंवा सुचनांसाठी आमच्याशी bconnect@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर नक्की संपर्क साधा.

Lavender Fields in Sequim, WA

संमेलनात सादर होणाऱ्या भारतातील कलाकारांच्या कार्यक्रमांसाठी प्रस्ताव द्यायचे असल्यास प्रवेशिकेची (RFP ची) अंतिम मुदत जवळ येत आहे. जर तुमच्या ओळखीचे भारतातील किंवा उत्तर अमेरिकेव्यतिरिक्त इतर कोणत्याही देशातील कलाकार (किंवा कलाकारांच्या वतीने तुम्ही) कार्यक्रमासाठी प्रस्ताव पाठवू इच्छित असतील/असाल, तर कृपया ते प्रस्ताव ६ सप्टेंबरपर्यंत आम्हाला पाठवा. उत्तर अमेरिकेतल्या कलाकारांच्या हातात अजून थोडा वेळ आहे पण आम्हाला तुमच्या कार्यक्रमांच्या कल्पना ऐकण्याची खूप उत्सुकता आहे. त्यामुळे अंतिम मुदतीपर्यंत म्हणजे दिवाळी पाडव्यापर्यंत न थांबता आपले प्रस्ताव लगेच आमच्यापर्यंत पाठवा. bmmseattle2026.org/programming-rfp/

स्मरणिकेसाठी कथा आणि बाकी लेखन, एकांकिका स्पर्धेच्या प्रवेशिका ह्या सगळ्यांवर आपण काम करत असाल ह्याची आम्हांला खात्री आहेच. शिवाय गेल्या महिन्यात सांगितल्याप्रमाणे 'स्वरमंच' ह्या गायन स्पर्धेचे नियम तसेच आणखीही काही धमाल स्पर्धांच्या घोषणा आणि नियम आम्ही लवकरच करणार जाहीर करणार आहोत.

संमेलनाच्या निधी संकलन समितीने ह्या महिन्यात $६००,०००चा टप्पा गाठला! वैयक्तिक तसेच व्यावसायिक देणगीदारांसाठी तयार केलेल्या पॅकेजची माहिती पुढील लिंकवर उपलब्ध आहे https://bmmseattle2026.org/individual-donor-package-tiers/ सर्व इच्छुक प्रायोजकांना विनंती आहे की त्यांनी आमच्याशी donations@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधावा.

स्नेहसंमेलनासंबंधीच्या आपल्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधा. आपण संमेलनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती आमच्या समाजमाध्यमांतून बघू शकता.

फेसबूक: www.facebook.com/bmm2026seattle ;
इंस्टाग्राम: www.instagram.com/bmm2026seattl_/
धन्यवाद.

पराग सहस्रबुद्धे, मार्केटींग टीम

रेशीमगाठी

उत्तर अमेरिकेतील मराठी तरुण मुलामुलींना आपल्यासारखा मराठी संस्कृतीत वाढलेला जोडीदार मिळावा ह्या उद्धेशाने BMMनी रेशीमगाठी हा मंच उपलब्ध केला आहे. BMM आणि न्यू जर्सीच्या मराठी विश्व ह्यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्यक्ष गाठ भेटीचा “Summer Soiree” हा सोहळा नुकताच १२ जुलै रोजी संपन्न झाला. त्यासाठी न्यू जर्सी बरोबरच शेजारच्या न्यू यॉर्क, व्हर्जिनिया, पेन्सिल्वेनिया, मॅसेच्युसेट इथून तर तरुण आलेच होते पण ओहायो, मिशिगन, कॅरोलिना, फ्लोरिडा, टेक्सास आणि थेट कोलोरॅडो, वॉशिंग्टन स्टेट पासून येऊन ११४ जण जमले होते. हा एक प्रकारचा विक्रमच म्हणता येईल.

आलेल्या तरुण तरुणींना हलक्या फुलक्या वातावरणात एकमेकांची ओळख होण्यासाठी Ice breakers चे खेळ, speed dating, सुग्रास जेवण, संगीत आणि त्यावर नृत्य असा भरगोस कार्यक्रम होता. सर्वांना कुणाच्या दबावाखाली न येता नव्याने भेटी घेता याव्यात आणि त्यातून मैत्रीचे आणि कदाचित प्रेमाचे बंध विणले जावेत हा रेशीमगाठीचा उद्धेश नक्कीच सफल झाला.

ह्या मेळाव्याला प्रचंड मागणी असूनही शेवट जागेअभावी काही लोकांना waitlist वर ठेवावं लागलं. मिळालेल्या प्रतिसादावरून अशा मेळाव्याची गरज आहे हे लक्षात येतं. वरचेवर देशाच्या वेगवेगळ्या शहरात असे मेळावे आयोजित करत मराठी संस्कृती जपणाऱ्या आणि नव्या नात्यांना संधी देणाऱ्या प्रत्येकाच्या साथीने पुढे जाण्याचा रेशीमगाठीच्या कार्यकारी मंडळींचा संकल्प आहे.

Video Link:
https://www.facebook.com/watch/?v=1519905242716695&rdid=XR9qVQuSBAA6inVf



- **रेशीमगाठी संघ**

बृहन्महाराष्ट्र मंडळ मराठी शाळा: २०२५ सालच्या परीक्षांचा वृत्तांत

दरवर्षीप्रमाणे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मराठी शाळा विभागातर्फे घेतल्या जाणाऱ्या वार्षिक परीक्षा उत्तमरीत्या पार पडल्या. या परीक्षा मे आणि जून महिन्यात घेतल्या जातात. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अभ्यासक्रमांतर्गत घेतल्या जाणाऱ्या बालवाडी ते इयत्ता ५वीसाठीच्या परीक्षांसाठी अमेरिका, कॅनडा, युरोप, ऑस्ट्रेलिया या देशांतील मराठी शाळांमधील एकूण २३१५ विद्यार्थी बसले होते.

त्याचप्रमाणे यावर्षी प्रथमच महाराष्ट्र शासनाच्या बालभारती पुस्तकांचा आणि अभ्यासक्रमाचा बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे चालवल्या जाणाऱ्या शाळांच्या अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला. या अभ्यासक्रमांतर्गत बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषेची आंतरराष्ट्रीय मूल्यांकन परीक्षा घेण्यात आली. उत्तर अमेरिका, कॅनडा आणि डेन्मार्क या देशामधील १०३ विद्यार्थ्यांनी एकाच दिवशी ही परीक्षा दिली. या उपक्रमाची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यात आली.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी १५ शिक्षकांनी अविरत परिश्रम घेतले. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शाळेच्या सर्व शिक्षकांचे, स्वयंसेवकांचे विशेष आभार! त्याचप्रमाणे परदेशात राहत असूनदेखील आपली मातृभाषा ओढीने आणि आवडीने शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे मन:पूर्वक अभिनंदन!!

वर्षभर सातत्याने मराठी शाळेतर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांसाठी मराठी शाळा समिती कार्यरत होती. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मराठी शाळेचे विभाग प्रमुख श्री. राहुल देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली मयुरी नाईक, मीनल जोशी , सविता मोरे, अंजली भिडे, माधवी पुरकर, पूनम शिरवाळकर, मृण्मयी इनामदार यांनी या समितीत काम केले.

राशिभविष्य : ऑगस्ट २०२५
“या महिन्यात नारळी पौर्णिमा, रक्षा बंधन, गणेशोत्सव, गोपाळकाला/ कालाष्टमी, पोळा हे सण साजरे करुया."
अजय तनखीवाले
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

उत्तरंग

BMM उत्तरंगाच्या Father's Day निमित्ताने सादर झालेल्या "लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रे" या विशेष कार्येक्रमात काही उत्तररंगीयानी आपल्या वडिलांच्या आठवणी सादर केल्या. त्यातीलच काही आठवणी येत्या काही महिन्यात वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

माझे दादा

माझे दादा, म्हणजे माझे वडील प्रोफेसर वाघमारे, हो, ते नेहमीच 'प्रोफेसर वाघमारे' म्हणूनच ओळखले गेले. अगदी पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे ह्यांच्यासाठी सुद्धा.

दादा काळाच्या पुढे होते. त्यांचं लग्न १९३१ साली झालं. त्या काळी सुद्धा त्यांनी पत्रिका न पाहता लग्न केलं.

दादांनी आम्हां भावंडांवर जेव्हढं प्रेम केलं, तितकंच त्यांनी त्यांच्या सुनांवर आणि जावयांवरही प्रेम केलं.

एक आठवण ...... मी एकदां दादांशी बोलत बसले होते. तेव्हां ते म्हणाले "अगं, बोलत काय बसलीस, जरा त्या वहिनीला मदत कर".

दादा पुरोगामी विचारांचे होते. दादांची आई गेली तेव्हा त्या कालच्या रितीनुसार माझ्या आईने घरी दिवाळीच्या फराळाचे जिन्नस केले नाहीत. कदाचित लोक काय म्हणतील ह्याचीही काळजी वाटली असेल तिला. पण दादा तिला म्हणाले "आई गेली, तिच्या जीवाचं सोनं झालं. पण घरांत लहान मुलं आहेत. सगळं फराळाचं व्यवस्थित करून दिवाळी साजरी झाली पाहिजे". माझ्याकडे वळून म्हणाले "Always remember, Life is for living, you have to move on. जे आहेत त्यांना आनंद द्यायचा."

बडोदा कॉलेजमध्ये दादा बी.ए. च्या पहिल्या वर्षाला असतांना प्रा. चिं. वि. जोशी मराठीचे प्रोफेसर होते. दादांना त्यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन प्रथमपासून शेवटपर्यंत लाभले. पुढे दादांनी ४ इंग्रजी आणि ४ मराठी पुस्तके लिहिली. त्यांच्या "श्रीकरपंत" ह्या पुस्तकाला बडोदे सरकार आणि ग्वाल्हेर सरकार यांच्याकडून पुरस्कार मिळाला. त्याची प्रस्तावना दादांचे गुरुवर्य प्राध्यापक चिं. वि. जोशी यांनी लिहिली आहे.

१९४८च्या जूनमध्ये दादा बडोद्याच्या कॉमर्स कॉलेजमध्ये प्रोफेसर असतांना, त्यावेळचे महाराज प्रतापसिंह गायकवाड ह्यांनी त्यांच्या इंग्रजी व गुजराती भाषणांचा मराठी अनुवाद करण्याची कामगिरी दादांना सोपवली होती.

दादा बडोदा कॉलेजमध्ये इंग्रजी व मराठी शिकवत असतांना त्यांना एक असामान्य अनुभव आला. दादांचा एक विद्यार्थी प्रभाकर, त्यांना स्वतःच्या कविता वाचायला आणून देत असे. दादांना त्याच्या कविता आवडल्या, त्यांनी प्रभाकरला थोडे मार्गदर्शनही केले. कॉलेज संपल्यावर तो भेटला नाही. पण कॉलेज सुरू झाल्यावरही तो दिसला नाही. एके दिवशी दादा घरी लेक्चरची तयारी करत असतांना, एक वृध्द गृहस्थ आले. दादांना नमस्कार करून ते म्हणाले "मी दुर्दैवी प्रभाकरचा बाप. प्रभाकर सुटीमध्ये टॉयफॉईडने गेला". दादा स्तंभित झाले. ते गृहस्थ पुढे म्हणाले "प्रभाकर रोज डायरी लिहायचा. त्यांत तुमचा अनेकदा गौरवास्पद उल्लेख आहे. माझी बायको, मुलगा गेल्यामुळे हाय खाऊन आजारी पडली. थोडा विरंगुळा म्हणून मी तिला रोज प्रभाकरची डायरी वाचून दाखवायला लागलो. ती ऐकल्यावर तिनं आग्रह धरला कि प्रभाकरच्या ह्या आवडत्या प्रोफेसरला मला भेटायचंय. मी तिला म्हटलं "तू बरी हो, घेऊन जाईन मी तुला त्यांच्याकडे". पण ते शक्य झालं नाही. मुलाच्या पाठोपाठ माझी बायकोही गेली. जिवंतपणी मी तिची इच्छा पूर्ण करू शकलो नाही. पण मी देव्हाऱ्यांत जपून ठेवलेल्या तिच्या अस्थि घेऊन आपल्याकडे आलोय, त्यांना आपलं दर्शन करवतो". असा हा हृदयद्रावक प्रसंग दादा कधीच विसरू शकले नाहीत.

दादांनी शिक्षणखात्यांत काय केलं नाही? आधी हायस्कुल टीचर, पुढे कॉलेज प्रोफेसर, कॉलेज प्रिन्सिपॉल.... रिटायर झाले तेव्हां आणंदच्या सरदार पटेल युनिव्हर्सिटीचे (जी आतां S. P. University म्हणून ओळखली जाते) डीन ऑफ फॅकल्टी ऑफ आर्टस् होते.

दादा विसनगरला M. N. Collegeमध्ये इंग्लिश डिपार्टमेंटचे मुख्य होते, तेव्हा त्यांनी एका गरीब विद्यार्थ्याला दोन वर्षे आपल्या घरी ठेवून त्याला बी. ए. ची पदवी मिळवून द्यायला मदत केली.

दादा अनेक परीक्षांचे परीक्षक होते. B. A., M. A., I. A. S. चे परीक्षक होते. ते शिक्षणखात्यात असताना त्यांनी एक ऐतिहासिक बदल घडवून आणला. पुण्याच्या S.S.C. बोर्डाला दादांनी पत्र पाठवलं. ते असं "जे विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीमुळे शाळेत जाऊ शकत नाहीत, पण घरी अभ्यास करून परीक्षेस बसू इच्छितात, त्यांना

शालान्त परीक्षेस बसण्याची परवानगी द्यावी". तो ठराव मान्य झाला. ती एक ऐतिहासिक घटना ठरली.

दादा १९६९ साली बडोद्याच्या वाङ्मय परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांचे अनेक सत्कार झाले, त्यांच्या नावाने युनिव्हर्सिटीने M. A. English साठी शिष्यवृत्ती चालू केली. दादांच्या अंत्यसंस्काराला ६००-७०० लोक आले.

दादा हयात असतांना त्यांनी माझ्या आईला बजावून सांगितले "मी आधी गेलो तरी तू सवाष्णचं असणार आहेस. अनेक वर्षं संसार केलेली स्त्री आमरण सवाष्ण असते".

माझ्या भावांनी आणि वहिनींनी दादांची मरणोत्तर जन्मशताब्दी साजरी केली. तेव्हा वहिनीने भाषणात म्हटले "पुनर्जन्म आहे कि नाही, माहित नाही. पण असलाच तर मला पुन्हा दादांची सून व्हायचंय". ह्यापेक्षा जास्त समर्पक भावपूर्ण श्रद्धांजली असू शकते का ???

- सुधा दीक्षित

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

माझे वडील म्हणजे "दादा"

वडील, म्हणजे 'दादा' त्यांच्या बद्दल असलेल्या आभाळभर आठवणीतलीतली माझ्या ७ /८ वर्षीय वयाच्या मनावर कायम कोरलं गेलेलं हे चित्र डोळ्यांसमोर येतच येतं .

काळ खूप जुना, उन्मत्त रझाकाराच्या विळख्यातून स्वतंत्र होण्यासाठी झालेले 'पोलीस ॲक्शन'. सरदार वल्लभभाई पटेलांनी घेतलेला निर्णय. तेलंगणासह मराठवाड्यातली जनता रझाकाराच्या जुलमी वर्चस्वाखाली दबली गेली होती. भर रस्त्यावर कापाकापी, खुले आम दुकानाला आगी लावणे, रस्तोरस्ती दंगली, सगळीकडे अत्यंत भयावह वातावरण. कोण कुणाला कधी कसे मारेल याचा भरवसा राहिला नव्हता. सत्ता झुगारण्याची लढाईच होती ती. कुणालाही जिवाची शाश्वती नव्हती. त्या वेळी दादांनी आईसह आम्हां आठ भावंडांना, पित्यासारख्या असणाऱ्या आपल्या वडील बंधूकडे रोह्याला नेऊन सोडले. आणि पुन्हा बीडला परतले. ह्या लढयात आपले कर्तव्य बजावत सामील झाले. आठ दहा महिने अश्या काहीही होऊ शकणाऱ्या परिस्थितीत बीडला एकटे राहिले. त्यांनी घेतलेल्या ह्या धैर्यपूर्ण निर्णयाचा, माझ्या मनावर झालेला प्रचंड प्रभाव मी आता ८०वर्षे ओलांडली तरी अजूनही आहे. खरं म्हणजे अश्या वेळी ते रोह्याला सुरक्षित राहू शकले असते. पण अश्या कठीण परिस्थितीत कर्तव्य करत लढ्याला तोंड न देणे हे त्यांच्यातील समाजसेवी डॉक्टरी मनोवृत्तीला पटले नाही. माझं काहीही वाईट होणार नाही पण डॉक्टर असल्यामुळे माझ्या सेवेची आत्ताच खरी गरज आहे असं सांगून ते मराठवाड्यातील बीड येथे स्थायिक झालेल्या गावी परतले. पित्यासमान आपल्या मोठ्या भावावरचा दृढ विश्वास, कुटुंबाची सुरक्षितता, आपल्या डॉक्टरीय शिक्षणाची आपल्या समाजाला खरी आत्ताच गरज असल्याची जाणिवेने पुनश्च बीडला येणे ह्या त्यांच्या धैर्यपूर्ण निर्णयांमुळे त्यांच्याबद्दलचा अभिमान, आदर आणि प्रेम माझ्या मनात सातत्याने वाढला नाही तर नवलच.

असे माझे वडील डॉ. भास्कर विष्णू आठवले गोरेपान नाकीडोळी तरतरीत. त्यांचा पेहराव त्या काळाला व खेड्याला अनुसरून होता. म्हणजे पायात बूट पांढरे शुभ्र धोतर, सदरा व त्यावर मोतीया रंगाचा कोट आणि डोक्यावर काळी टोपी. म्हणजे संघनिष्ठ. त्याकाळी मुंबईहून थेट मराठवाड्यातल्या बीड सारख्या वीज रस्ते नसलेल्या, रझाकारचा अंमल असलेल्या गावी स्थायिक होण्यामागे निश्चित हेतू होता.

त्यांच्याकडे येणारे पेशंट म्हणजे मुख्यत्वे शेतकरी होते. अंगावरचे फाटके तुटके कपडे झाकण्यासाठी खांद्यावर कांबळ घेतलेले. औषधाचे पैसे तर घेतले जायचे नाहीतच, पेशंटला दुकानातून 'कुडत' घेण्यासाठी पैसे द्यायचे. त्यांच्यातले हे विलोभनीय औदार्य पाहून आम्ही भावंडं थक्कच व्हायचो. त्यांनी शेत विकत घेतलं होतं. शेतात पाण्यासाठी विहीरीवर पंप बसवलेला म्हणजे सगळ्यांना अपृपच वाटायचं . शेतातले धान्य, उस रस गुळ हरभरा, हुरडा भाजी पाला फारसं विक्रीला जात नसे शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळायचा. आपल्याला काही कमी पडणार नाही असं त्यांच म्हणणं असायचं. खेड्यात जातपातीचा पगडा खूप असायचा. आमच्या घरी मात्र, हातपाय धुवून महार, मांगाने भरून ठेवलेले पाणी देवाच्या पूजेला, स्वयंपाकाला आईला चालवून घ्यावेच लागायचे.

वटवृक्षाची सावली, कणखर आधार देणारा असणारा हा 'वडील' वटवृक्ष आपल्याला संस्कारित करत नकळत आपल्यासाठी कल्पवृक्षच होतो. वडील म्हणजे आमचे, 'माझे दादा' असं म्हंटलं की कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला ह्या शब्द सुरांतील आर्तता ह्या क्षणी ह्या वयातही ही मनात दाटून येते.

- मीना दीक्षित

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

लक्ष्यवेधी



आदित्य देशमुख (currently in US Navy)

मूळचा न्यू जर्सीचा आदित्य सध्या US Navy मधे पायलट म्हणून यशस्वीपणे प्रगती करत आहे.

आपला मराठी झेंडा US Navy मध्ये घेऊन जाणरा आदित्य 'लक्ष्यवेधी ' च्या दुसऱ्या सत्रात आपल्याला भेटायला आला आहे. त्याच्या या महत्वाकांक्षी प्रवासाचा आढावा घेणारी श्वेता चक्रदेव यांनी घेतलेली ही मुलाखत सर्वांना आवडेल आणि प्रेरणादायी ठरेल, अशी आशा आहे.

लिंक: https://youtu.be/LdOO-KljOg4

तुमच्या ओळखीचेही जर कोणी सैन्यात, सरकारी विभागात, पोलिसात, किंवा नेहमी न ऐकलेल्या नव्या रस्त्यावर चालू पाहणारे असतील तर आम्हाला नक्की कळवा. आम्ही त्यांच्याशीही जरूर संवाद साधू.

- **श्वेता चक्रदेव**, पिट्सबर्ग

स्वर-गणेश

नमस्कार, गणपती बाप्पा मोरया!

उत्तर अमेरिकेतील कलाकारांसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळ घेऊन येत आहे एक नाविन्यपूर्ण उपक्रम: स्वर-गणेश

उत्तर अमेरिकेतील स्थानिक कलाकारांनी स्वत: लिहिलेली वा संगीतबद्ध केलेली गणेश भक्तिपर रचना आम्हाला MP3 format मध्ये पाठवा. आम्ही ती रचना आणि आपला संपर्क सर्व महाराष्ट्र मंडळांपर्यंत पोहोचवू जेणेकरून ते आपापल्या गणेशोत्सवात आपल्या प्रेक्षकांना ऐकवू शकतील. तसेच ती रचना बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या You Tube channel वरही प्रसारित केली जाईल.

Disclaimer : या उपक्रमाचा उद्देश्य हा स्थानिक कलाकारांच्या कलेला उत्तर अमेरिकेतील जनतेपर्यंत पोहोचवणे एव्हढयापुरता मर्यादित आहे. यात कुठलाही आर्थिक व्यवहार असणार नाही. रचना बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सदस्य मंडळापर्यंत पोहोचवली जाईल. मंडळांनी तिचे प्रसारण करणे हा त्यांचा निर्णय राहील. बृहन्महाराष्ट्र मंडळ कुठलाही डेटा गोळा करणार नाही.

Please fill in your name, email, phone, song-credits, permission to play the song free of charge in the following form.

Please upload the MP3 file as indicated in the form below. forms.gle/LjTmQvSARRmQHoN97

श्रावणी हिरवळीचा मराठी मृदगंध

श्रावण महिन्याला सर्व महिन्यांचा, व्रतांचा/सणांचा राजा म्हटले तर वावगे होणार नाही. श्रावण महिना हा पूर्णपणे सणासुदींनी भरलेला असतो. सण समारंभ आले की साग्रसंगीत खाणे, गोडाधोडाचा स्वयंपाक हे सगळे आलेच. तसेच सजणे सवरणे पण ओघात आलेच. एकंदरीत राजेशाही थाटात सगळे श्रावण महिन्यातले दिवस साजरे केले जातात. जसा सजण्याचा बाज तसेच याला एक कौटुंबिक, सामाजिक, आधात्मिक,पारंपारीक असे अनेक दृष्टीने महत्व प्राप्त होते. त्यात निसर्ग पण आपली किमया दाखवतो. या सगळ्यामध्ये हिरिरीने भाग घेतो. हवेत, वातावरणात एक प्रकारचे चैतन्य, उत्साह, ताजेपणा आणतो. श्रावणात अनेक सण आहेत जसे की मंगळागौर त्याला अनेक प्रकारची पाने, फुले पुजेसाठी लागतात तर

श्रावणातल्या नूतन पालवीमुळे ते सहजच शक्य होते. निसर्ग आपला असा हातभार ह्या सणांच्या सजावटीला, पूजेला देत असतो. आपल्या मराठी वर्षाच्या कालगणनेप्रमाणे श्रावण महिना हा वर्षातील पाचव्या क्रमांकाचा महिना आहे. या महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्राच्या सान्निध्यात असतो त्यावरून या महिन्याला श्रावण असे नाव मिळाले आहे. श्रावण महिन्याला हिंदी भाषेत सावन तर संस्कृतमध्ये श्रावण असे म्हणतात. श्रवणारा म्हणजे पडणारा पाऊस याच्याशी संबंधित असल्यामूळे श्रावण महिन्याचे नामकरण झाले असावे. श्रावण महिन्यामध्ये येणाऱ्या प्रत्येक वाराला निरनिराळ्या पूजा, व्रतवैकल्ये, नेम करायला सांगितले आहे. श्रावणी सोमवार त्या बरोबरची खुलभर दुधाची कहाणी, मंगळागौरीची पूजा आणि त्याचे खेळ, श्रावणी शुक्रवारचे हळदकुंकू आणि जिवतीची पूजा, कृष्णाष्टमीची पूजा, दहीहंडीचा खेळ, रक्षाबंधन, नागपंचमीचे वर्णन, कहाण्या, बायकांचे उखाणे, ओव्या, झाडावरचे झोपाळे आणि लोककला यामधून श्रावण फक्त ऋतु नाही तर सांस्कृतिक ऋतु म्हणून उलगडतो. सण, उत्साह आणि लगबग ह्याचे प्रतीक म्हणजेच श्रावण.

श्रावण महिना हा मराठी साहित्यामध्ये अत्यंत प्रेमाने, भावनिकतेने आणि सौंदर्याने वर्णन केला गेलेला महिना आहे. अनेक मराठी लेखक, कवी, साहित्यिकांनी श्रावणाचे सौंदर्य, त्यातील सण-उत्सव, निसर्गावर आधारलेली कविता आणि धार्मिक महत्त्व या सर्व अंगांनी श्रावणावर लिखाण केले आहे. श्रावण महिन्यावर आधारित मराठी साहित्य हे अत्यंत समृद्ध, निसर्गप्रेमी आणि भावनांनी ओथंबलेलं आहे. यामध्ये कविता, लेख, गीते, कथा आणि आठवणींमधून श्रावणाचं वर्णन विविध प्रकारे आढळते.

श्रावण महिन्यापासून वर्षाऋतूचा प्रारंभ होतो. क्षणात येणारी पावसाची जोराची सर आणि त्यानंतर पडणारे ऊन, हा ऊन पावसाचा खेळ श्रावण महिन्यात सतत चालू असतो. श्रावण महिन्याबद्दल बोलताना बालकवींची श्रावणमास नावाची एक सुंदर कविता आठवते.

“श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे
क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे ।
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधिले, नभोमंडपी कुणी भासे ।“

बालकवी यांच्या ह्या कवितेच्या ओळी श्रावण महिन्याचे सौंदर्य, हिरवळ, पावसाळी वातावरण, अंतरंगातील आनंद यांचे सजीव निसर्गचित्र दर्शवतो. त्यात पावसाने भरलेले वातावरण, क्षणभरात येणारा सौम्य सूर्यप्रकाश, इंद्रधनुष्याची उपमा, निसर्गातील लयबद्धता दाखवते. हिरव्या रंगाची समृद्ध हिरवळ, क्षणभंगुर पावसाचे थेंब (सरसर शिरवे), क्षणात पुन्हा उजेडाचे किरण, दुहेरी छटा देणारा इंद्रधनू, गगनावर झळकणारे मंगल तोरण हे सगळे निसर्गाच्या किमयेचे दर्शन घडवते.

कवी बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेतल्या चार ओळी ग्रीष्म ऋतूमध्ये पावसाची वाट पहाणाऱ्या धर्तीवर श्रावण धारा बरसू लागल्या की आठवतात,

“आला आषाढ-श्रावण | आल्या पावसाच्या सरी
किती चातकचोचीने | प्यावा वर्षाऋतू तरी!”

अशा तऱ्हेने धरतीला मनसोक्त भिजवून तिला एक मनोहारी हिरवेगार देखणं रूप देणाऱ्या या श्रावण महिन्याचं खूपच अप्रुप वाटतं.

"श्रावणात घन निळा बरसला रिमझिम रेशिमधारा"
उलगडला झाडांतुन अवचित हिरवा मोरपिसारा”

मंगेश पाडगवकर यांनी ह्या ओळींतून श्रावणाच्या भरपावसाच्या वातावरणाची, पावसाच्या सौंदर्याची चित्रे चितारलेली दिसून येते.

“श्रावण आला ग वनी, श्रावण आला! दरवळे गंध मधुर ओला
एकलीच मी उभी अंगणी, उगीच कुणाला आणित स्मरणी”

ग. दि. माडगूळकर यांनी या गीतात श्रावण महिन्याचे सुंदर दृश्य चितारले आहे, निसर्गातील दरवळलेला गंध, रिमझिम पावसाचे थेंब, झाडे डोलत आहेत असे नयनमनोहर वर्णन. गदिमांनी त्यांच्या या शैलीतून श्रावणाच्या पारंपरिक आणि भावनात्मक रूपाला काव्यात्मक रूप दिले आहे.

“श्रावणझड बाहेरी मी अंतरी भिजलेला
पंखी खुपसून चोच एक पक्षी निजलेला...”

कवी अनिल या ओळींद्वारे आतल्या व बाहेरच्या ‘झडी’ म्हणजे पावसाच्या रिमझिममधून मनातील खोल विदारक चेहरे उलगडतात. ‘झड’ हा शब्द दुःख आणि अश्रूंशी देखील जोडतो. बाहेर पाऊस (झड) आणि आत मनातील भावनिक ओलावा यांचा समन्वय. या कविता माध्यमातून श्रावणाच्या पावसाने अंतर्मनाच्या खोलीमधल्या दाट जिवंत आठवणी, भावनात्मक परिसंवाद उभे केलेले दिसून येतात.

"हासरा नाचरा जरासा लाजरा,
सुंदर साजिरा श्रावण आला।
तांबूस कोमल पाऊल टाकीत,
भिजल्या मातीत श्रावण आला।"

कुसुमाग्रज यांच्या श्रावण कवितासंग्रहातील या ओळी सांस्कृतिक, ललित व निसर्गात्मक अनुभूतीने श्रावणातले सार प्रत्यक्ष डोळ्यापुढे उभे करते. कवितेची सुरवात श्रावणाचे सौंदर्य, निसर्गाची जागृतता आणि वातावरणातील आनंद स्पष्टपणे उलगडते. तांबूस पाऊल, हिरव्या रानात केशराचे डाग, इंद्रधनुष्य, आणि ढगांच्या छायेतून निर्माण होणारे दृश्य हे सर्व निसर्गाच्या विविध पैलूंना कवितेत समाविष्ट करतात. श्रावण म्हणजे आनंद, सृष्टीची हरवलेली ताजगी, आणि भावनांची उजळणी असे अर्थ या ओळींतून वाचायला मिळतात.

दुर्गा भागवत त्यांचा प्रसिद्ध 'ऋतुचक्र' हा लेखसंग्रह भारतीय महिन्यांच्या निसर्गविषयक निरीक्षणांचा एक सखोल आढावा आहे. या लेखात लेखिकेने श्रावणातल्या निसर्गाचे अचूक वर्णन केले आहे, ते असे की निसर्ग हळूच फुंकर घालून हिरवळीची धूळ सगळीकडे पसरवतो.

अशी ही श्रावण महिन्यासंबंधीची उल्लेखनीय साहित्याची झलक म्हणता येईल. श्रावणात निसर्ग बहरतो, सजतो आणि त्यामुळे आपण पण सजतो फुलतो. याचेच यथार्थ वर्णन मराठी साहित्यातून दिसून येते. असा हा श्रावण या वेळी २५ जुलै पासून २३ ऑगस्ट पर्यंत आहे.

श्रावण श्रावण बरसला मनभावन
श्रावण श्रावण रंगांची उधळण
श्रावण श्रावण चैतन्य आनंद
श्रावण श्रावण सजणे सवरणे
श्रावण श्रावण सणासुदीचे खाणे
श्रावण श्रावण आपलेपणा मोकळेपणा
असा हा श्रावण महिन्यांचा राजा
दिमाखात आला अन् नटून बसला
चैतन्य पसरवून आनंद आणला
नि सजून बसला ।।

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

तुझा माझा पाऊस

एकच आशा....
तुझा माझा पाऊस ...
कधीच एक नव्हता
तुझा पाऊस ढगातून,
अंगणात पडायचा,
माझा गळक्या छपरांतून,
अंगावर कोसळायचा....
तुझ्या पावसात तुला हवी,
खमंग वासाची भजी, नी चहा,
माझ्या पावसात मला नकोशा,
होतात कुबट वासाच्या गोष्टी दहा
तुझ्या पावसात तुला वाटते,
डोंगरात भिजायची हवी मजा,
माझ्या पावसात, मला घडते,
कॅाटखालच्या गुहेत बसायची सजा...
तुझ्या माझ्या पावसांत,
एक मोठी दरी आहे,
ती ओलांडून तू ये माझ्या पावसात ,
असे मी कधीच म्हणणार नाही,
माझ्या पावसाच्या जोरदार तडाख्यात
तुला जगता येणार नाही.....
एकच आशा करतो आता,
दरी मला ओलांडता यायला हवी,
तरच तुझा माझा पाऊस एक होईल,
तुला माझ्या छत्रीत साथीने चालता येईल...

- **चित्रा मेहेंदळे,** सिॲटल

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



कि -वेस्ट: अमेरिकेचे दक्षिण टोक !

आम्ही अमेरिकेच्या ईशान्य (नॉर्थ-ईस्ट) मध्ये राहतो. त्यामुळे इथले हिवाळे फारच कडक असतात. तापमान घसरून, बर्फ बराच पडतो. अशा हवेतून डिसेंबर - जानेवारी महिन्यांत, दक्षिणेच्या फ्लोरिडा सारख्या ठिकाणी जाणं, इथला नागरिक पसंत करतो! एक आठवड्यासाठी, अमेरिकेच्या दक्षिण टोकाला असलेल्या कि-वेस्ट ला (Key West) जाण्याचे ठरवले.

तेथे जाण्यासाठी आम्ही फोर्ट लॉडरडेलला (Fort Lauderdale) विमानाने जाण्याचे योजले. तिथे मायामी (Miami) वरून ही जात येते. परंतु, बहुसंख्य प्रवासी, फोर्ट लॉडरडेल पसंत करतात. दोन कारणे- एकतर प्रवास भाडे स्वस्त पडते; दुसरे इथला एअरपोर्ट मायामी पेक्षा छोटा आहे! आम्ही दोघे, मुलगी, जावई, नात, नातू आणि त्याची मैत्रीण, असे सात जण (वयोगट ८६ ते २३) पहाटे ६च्या विमानाने जानेवारीच्या २ ला निघालो.

सकाळी ९:३०च्या सुमारास विमान फोर्ट लॉडरडेलला पोहोचले. तिथून गाडी रेंट करून आमची व्हॅन मायामीच्या दिशेने चालू लागली. जाताना मायामी बीच वरून आमची गाडी जाणार होती. पोटपूजेसाठी एका इटालियन रेस्टॉरन्टमध्ये थांबलो. कि-वेस्ट ला येण्याचे उद्देश दोन- हिवाळ्यात पाण्यात (समुद किंवा हॉटेलच्या स्विमिंग पूल) डुंबायला हीच चांगली जागा आहे; व अमेरिकेत असल्यामुळे व्हिसाची कटकट नाही! (नातवाची मैत्रीण ब्राझीलची होती व तिच्याकडे अमेरिकेचा व्हिसा नव्हता)

कि-वेस्ट हे बेट फ्लोरिडाच्या सामुद्रधुनीतील (Strait) एक बेट आहे. बेटाची भौगोलिक जागा आहे २६०-३३''-५५' उत्तर (मुंबईची आहे १९०-०४ "-३४'). त्यावरून कल्पना येईल की विषुववृत्तापासून फार दूर नाही! बेटाची लांबी ४ मैल (६ किमी) तर रुंदी आहे १ मैल. त्यामुळे क्षेत्रफळ भरते ४.२ मैल. समुद्रसपाटीपासून ऊंची आहे फक्त ८ फूट!

ही सलग युनाइटेड स्टेट्स च्या सर्वात दक्षिणेकडील सिटी आहे. ही व इतर अनेक बेटे ‘फ्लोरिडा कि’ च्या हायवेने जोडलेली आहेत. त्यामुळे मायामीहून ह्या हायवेने प्रवास करताना सगळीकडे पाणीच पाणी नजरेस पडते!

इथले पर्यटकांचे सर्वात आकर्षण म्हणजे तरते (Buoy). ही कॉंक्रीटची तरंगती खुण म्हणजे युनायटेड स्टेट्स सर्वात दक्षिणेचे टोक समजली जाते. हे टोक सर्वसामान्यांप्रमाणे राहिले असते, पण कि-वेस्ट सिटीने स्मारक उभारले १९८३ मध्ये! ह्या स्मारकाचे नुकसान २०१७ च्या हरिकेन इर्मामुळे झाले. परंतु, स्मारक परत दुरुस्त केल्याने आता जास्त पर्यटक त्याचे फोटो घेतात. हे स्मारक दक्षिणेकडील टोक मानले गेले तरी प्रत्यक्ष टोक याच्या दक्षिणेला आहे. ते नेव्हीच्या हद्दीत असल्यामुळे तिथे पर्यटकांना जाता येत नाही. ह्या कॉंक्रीट तरत्यावर लिहिले आहे की तरते क्युबापासुन ९० मैल आहे. प्रत्यक्षात इथून क्युबा ९५ मैल (१५३ किमी, ८३ सामुद्री मैल) आहे.

१९५० च्या अखेरीस बेटाच्या पूर्वेकडील मिठागरे बुजवून त्या जागी शॉपिंग मॉल्स, राहण्याच्या जागा, शाळा, क्रीडांगणे, बांधण्यात आली. तसेच, इंटरनॅशनल एअरपोर्ट उभारण्यात आला. व ह्या सर्वाना नाव दिले 'न्यू टाउन'. सर्वांत जुन्या इमारती बेटाच्या पश्चिमभागात असल्याने त्याला 'ओल्ड टाउन' म्हणून संबोधले जाते. त्या ठिकाणी तुम्हाला Duval Street आढळेल. हा हमरस्ता १.० मैल लांब असून तो गल्फ ऑफ मेक्सिको पासून फ्लोरिडा सामुद्रधुनी व अटलांटिक महासागराला जोडतो.

ओल्ड टाउन मधील हेमिंग्वेच्या घराचे आकर्षण पर्यटकांत आहे. हा लेखक इथे सन १९३१ ते १९३९ पर्यंत राहत होता. अशी वदंता आहे कि लेखकाने 'Farewell To Arms' ही कादंबरी एका फोर्ड डीलरशिप शोरूमच्या वरती राहून लिहिली! त्या वेळी तो फोर्ड कारच्या डिलिव्हरीची वाट बघत होता. ही गाडी त्याच्या बायकोच्या काकाने भेट म्हणून दिल्याचा उल्लेख आहे. हार्डवेअर स्टोअरचा मालक चार्ल्स थॉमसन ह्याने 'सी डीप फिशिंग' चा नाद लावला. त्यासाठी मित्रांचा घोळका जमविला. त्या कंपूत प्रत्येकाला टोपण नाव मिळाले. हेमिंग्वेला 'पपा' म्हणून टोपण नाव प्राप्त झाले. त्या कंपूत जो 'रसेल' म्हणून होता त्याचा उल्लेख 'फ्रेडी' म्हणून 'To Have And Have Not' मध्ये लेखकाने केलेला आहे असे काही तज्ञाना वाटते!

Mrs. Pauline Hemmingway चे काका 'Gus Pfeiffer' ह्यांनी लग्नाची भेट म्हणून '९०७ व्हाइटहेड' हे घर दिले. सन १९३७-३८ च्या काळात स्विमिन्ग पूल बांधण्याचे योजले, तो बांधण्यासाठी, अपेक्षेपेक्षा जास्त खर्च आल्याने, हेमिंग्वेने ओल्या कॉंक्रिट मध्ये पेनी रोवून "घे ही शेवटची पेनी!” असे म्हणून कॉंट्रॅक्टरला दक्षिणा दिली. ते नाणे अजूनही पूलाच्या उत्तरेला पाहायला मिळते. ह्या घरात राहून लेखकाने 'Death in the Afternoon', 'For Whom The Bell Tolls', ‘The Snows Of Kilimanjaro' आणि 'The Short Happy Life Of Francis McComber' ही पुस्तके लिहिली. याशिवाय त्यांनी 'To Have and Have Not’ ही कादंबरी लिहिली. ह्या कादंबरीतील दृश्ये अमेरिकेतील होती, परदेशातील नव्हती! ह्या घरात पायाची सहा-सात नखे असलेली मांजरे पाहायला मिळाली, ही मांजरे, ‘Snowball' नावाच्या मांजरीची, हेमिंग्वे काळापासून, वंशावळ आहे.

आणखी एका प्रसिद्ध लेखकाचे माहेर आहे हे शहर! टेनेसी विल्यम्स (Tennessee Williams). ह्यांनी त्यांचे सुप्रसिद्ध नाटक - 'A Streetcar Named Desire' हे सन १९४७ मध्ये इथल्या एका हॉटेलमध्ये लिहिले. त्यांनी आपले घर सन १९४९ मध्ये

न्यू टाउनमध्ये घेतले आणि मरेपर्यंत -सन १९८३ पर्यंत -ते ह्या घरात राहत होते. हे घर सध्या खाजगी मालकीचे असल्यामुळे लोकांसाठी खुले नाही. त्यांच्या सुप्रसिद्ध नाटकाचे फिल्मीकरण 'The Rose Tattoo' ह्या बेटावर सन १९६९ मध्ये झाले. जरी टेनेसी विल्यम्स व अर्नेस्ट हेमिंग्वे समकालीन होते तरी त्यांची भेट झाली, हेमिंग्वे च्या क्युबाच्या (Cuba) घरात!

आणि एक घर कि-वेस्ट मध्ये प्रसिद्ध आहे. ते म्हणजे 'Little White House'! युलिसिस ग्रँट पासून अनेक अमेरिकन अध्यक्षांचे हे निवासस्थान सन १८८० पासून आहे. त्यानंतर ग्रोव्हर क्लीव्हलँड, टॅफ्ट, फ्रँकलिन रूझवेल्ट, हॅरी ट्रुमन, आयसेनहॉवर, जॉन केनेडी हे अध्यक्ष ह्या घरात राहून गेलेले आहेत. जिमी कार्टर सुद्धा, अध्यक्ष नसताना, सन १९९८ व २००७ मध्ये ह्या घराला भेट देऊन गेले.

आमच्या ग्रुप मधील काही तरुणांना, त्या वातावरणांत थोडी एक्साईटमेंट निर्माण करण्यासाठी शेवटच्या दिवशी जेट स्की करण्याचे योजले. त्यासाठी आमच्या हॉटेलमध्ये सोय होती. माझ्याकरता व माझ्या बायको साठी 'सिनियर सिटीझन' असल्यामुळे थोडी अडचण निर्माण झाली. मी सँडविच सारखा माझी मुलगी, मोना व नात, मेघना ह्याच्या मध्ये बसलो. माझी बायको शीला, आमच्या जावई डॅरलच्या मागे बसली. नातू जस्टीन, त्याची मैत्रीण ब्रुनाबरोबर बसला. आमच्या बरोबर आणखी चार जेट स्की होत्या. गाइड किंवा आमच्या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दोन प्रशिक्षकही आमच्याबरोबर होते. जवळजवळ तास, दीड-तास आम्ही पाण्यावरून जेट स्की करत होतो. पाण्यावरून तरताना जी मजा आली त्याचे वर्णन करणे कठीण आहे! परत येताना अमेरिकेच्या दक्षिण टोकाला जाऊन आल्याचा सार्थ आनंद आम्हाला झाला होता!

- **सुधीर शं. कुलकर्णी**, न्यू यॉर्क

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

कॅल्गरी स्टॅम्पीड परेड

नमस्कार मंडळी,

तुमच्यासोबत ही आनंदाची बातमी शेअर करताना खूप अभिमान वाटतो आहे!

" कॅल्गरी स्टॅम्पीड परेड – फक्त नाव जरी ऐकलं तरी थरार उभा राहतो!"

जगातील सर्वात मोठ्या "Greatest Outdoor Show on Earth" मध्ये सहभागी होणं, ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे. हजारो सहभागी, आणि तब्बल साडेतीन लाखांहून अधिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत, गेल्या १४० वर्षांची परंपरा लाभलेल्या या भव्य परेडमध्ये कॅल्गरी मराठी असोसिएशनचा (CMA) चौथ्यांदा सहभाग होता — आणि यंदाचं वर्ष विशेष होतं कारण CMA चं हे ४०वं वर्ष आहे!

२०२५ मध्ये 'विविधतेत एकता' या प्रेरणादायी थीम अंतर्गत आम्ही भारताची संस्कृती, परंपरा, आणि ऐक्य यांचं भव्य दर्शन घडवलं.

या वर्षी आमच्या संचात ओरिसा, बंगाल, उत्तरप्रदेश व राजस्थान येथील सदस्य देखील सहभागी झाले. विशेष म्हणजे या वर्षी प्रथमच घोड्यांसोबतचा एक भव्य रथ आम्ही परेडमध्ये सादर केला गेला, ज्यावर भारतीय इतिहासातील थोर विभूतींना स्थान देण्यात आलं.

खास आनंदाची बातमी अशी की – CMA ला '2nd Best Horse Drawn Conveyance' हा मानाचा पुरस्कार मिळाला!

गेल्या वर्षी देखील आम्हाला 'फॅन फेवरेट' हा पुरस्कार मिळाला होता, त्यामुळे स्टॅम्पीड परेडसाठी CMA च्या नेतृत्वाखाली भारतीय चमूला हा सलग दुसरा पुरस्कार होता.

या यशामागे आहे आमची एकजूट, अथक मेहनत आणि परंपरेप्रती असलेला अभिमान.

हा क्षण आपल्या सर्व भारतीय आणि मराठी समुदायासाठी अत्यंत गौरवाचा आहे.

जय हिंद जय महाराष्ट्र!

- **संदीप पवार**, BMM Rep - CMA

वृत्त दिवाळी अंक २०२५ साठी आवाहन

नमस्कार मंडळी,

बीएमएम वृत्तातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकाला या वर्षी ४४ वर्षं पूर्ण होत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे! बृ. म. मं. वृत्ताचा दिवाळी अंक - ऑक्टोबर - नोव्हेंबरच्या संयुक्त अंकासाठी, आम्ही नॉर्थ अमेरिका स्थायिक तसेच भारतातील देखील मराठी लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकारांना अभिरुचीसंपन्न साहित्य व दर्जेदार कलाकृती पाठविण्याचे आवाहन करीत आहोत. या अंकाला वैविध्यपूर्ण बनविण्यासाठी आपले लेख, कविता, नर्म विनोद, चुटके, हास्यचित्रे, प्रवास वर्णन आणि चविष्ट पाककिया सुद्धा जरूर पाठवाव्यात.

साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: ऑगस्ट १५,२०२५

अपेक्षित साहित्य व शब्दमर्यादा:

* कथा, लेख, निबंध: १००० शब्द (फोटो रहित)
*कथा, लेख, निबंध: ८०० शब्द (फोटो सहित)
* चुटके: १५० शब्द
* पाककिया, संकीर्ण उपयुक्त माहिती: ३०० शब्द
* कविता: २० ओळी

साहित्य पाठवण्याचे नियम:

- साहित्य आपले स्वतःचे असावे आणि इतरत्र प्रकाशित झालेले नसावे.
- रुपांतरित किंवा अनुवादित साहित्यावर मूळ लेखकाच्या नावासह तसा उल्लेख असणे आवश्यक आहे.
- साहित्याच्या निवडीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडलेल्या साहित्यात मोजकेपणा, सुस्पष्टपणा आणि शुध्दलेखन यांच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करण्याचा हक्क संपादकांना राहील.
- लेखकांनी साहित्याबरोबरच स्वतःचा संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-पत्ता (email address) पाठवणे आवश्यक आहे.
- निवड न झालेले साहित्य परत पाठवले जाणार नाही.

(A word file should be emailed to vrutta@bmmonline.org . While sending email, please have the email Subject added as **"Diwali Ank"**

टीप:

www.google.com/transliterate या वेबसाईटवर मराठीमध्ये टाईप करता येते. नंतर ते Microsoft Word मध्ये copy करून, save करून किंवा email मध्ये copy करून vrutta@bmmonline.org ह्या address वर पाठवावे.

जाहिराती आणि शुभेच्छा संदेश: जाहिरातीचे दर:

Full Page: $400 | Half Page: $250 |
Quarter Page: $150

BMM वृत्तात जाहिरात किंवा शुभेच्छा संदेश देण्यासाठी संपर्क साधावा- santosh.salvi@bmmonline.org or vrutta@bmmonline.org

आपली मुद्रणसिध्द जाहिरात किंवा शुभेच्छा संदेश 'वृत्त दिवाळी अंक' साठी **ऑगस्ट १५, २०२५** च्या आत मिळणे आवश्यक आहे.

Youth Corner: (age 5 to 18 years):

Vrutta team invites the second generation of Marathi American authors, poets and artists to contribute to the 'Youth Corner' section of "Vrutta Diwali Ank 2025', our annual Diwali Magazine. Send your articles, stories written in English OR Marathi. You can also send your drawings and artwork. All youth articles should be submitted before **August 15th 2025** to vrutta@bmmonline.org Your name, age and email address may be included with your submission. While sending email, please have the Subject added as **"Diwali Ank"**

आभारी आहोत,
बीएमएम वृत्त टीम

मराठी शाळा - निबंध स्पर्धा

मराठी शाळेतर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतल्या निबंधापैकी निवडक ६ निबंध प्रत्येक महिन्यात १ हयाप्रमाणे, स्पर्धेसाठी जसे पाठवले गेले आहेत तसे, वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

निबंध ५

परदेशस्थ जीवनातील मराठी भाषेची उणीव आणि जाणीव

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी

माझ्या सुदैवाने मी अश्याच घरात जन्माला आले जिथे आधीपासूनच पुलंची पुस्तके होती, बाबूजींची गाणी होती. शाळेत शिक्षिक गणित शास्त्राइतक्याच सहजतेने पृथ्वीचे प्रेमगीत किंवा फुलराणी कविता शिकवायचे. त्यामुळे माझ्या आई वडिलांना कधी माझ्यावर मराठी भाषेचे वेगळे संस्कार करावेच लागले नाहीत. आसपासच्या वातावरणात मराठी इतकी भिनली होते की परदेशात येईपर्यंत ती भाषा म्हणून कधी जाणवलीच नाही.

परदेशात आल्यावर सर्वप्रथम मराठीची जाणीव झाली ती माझी दोन अडीच वर्षांची मुलगी अमेरिकेत शाळेत जायला लागली तेंव्हा. तिचं लहानसे विश्व, तिची शाळा आणि तिच्यावर नकळत होणारा इंग्रजी भाषेचा प्रभाव जाणवायला लागला; आणि काहीसं असुरक्षित वाटायला लागले. आता ही अमेरिकन होणार. जे ऐकत, वाचत मी मोठी झाले त्यातले काहीच तिच्यापर्यंत पोचवता नाही येणार असे वाटायला लागले, आणि मग कर्मभूमी का मायभूमी असे द्वंद्व सुरु झाले. परत जाणे तर शक्य नाही. मग काय करायचे, सुवर्णमध्य तर साधायलाच हवा. मग काही गोष्टी ठरवल्या. मुलीला मराठी पासून दूर जाऊ द्यायचे नाही. घरात हट्टाने मराठीच बोलायचे. तिला याची सवय करायला अर्थातच थोडासा त्रास झाला. शाळेत अमेरिकन इंग्लिश आणि घरी मराठी. पण हळू हळू सवय होत गेली. या गोष्टीला आता १० वर्षापेक्षा जास्त दिवस होऊन गेलेत. घरात मराठी बोलणे इतके अंगवळणी पडलय की आता आपण असे काही ठरवून केले होते हेच तिच्यासकट आम्ही सगळे विसरलोय. त्यामुळे नकळत एक झाले की तिचे मराठी आजही अस्खलित आहे. त्यात अजिबात अमेरिकन उच्चाराचा प्रभाव नाही. भारतात गेलो की एक प्रश्न तिला सगळे विचारायचे, "मराठी बोलतेस का गं?" तिला आजही या प्रश्नाची अतिशय गंमत वाटते. ती नेहमी मला विचारते, " ई आई, हे असे काय विचारतायत मला." तेंव्हा आपला निर्णय बरोबर असल्याची जाणीव झाली. कृतकृत्य झाले. या सगळ्यात एक गोष्ट जाणवली की भाषेची सुरुवात आपल्यापासूनच होते. आपल्याला ती किती महत्वाची आहे त्यावर सगळे अवलंबून.

परदेशस्थ मराठी भाषेच्या जाणिवेत सगळ्यात मोठा वाटा आहे तो मराठी सणांचा. गुढीपाडवा, दसरा, दिवाळी असे सगळे मराठी सण भारतात असताना केले नव्हते इतक्या उत्साहात परदेशात साजरे होतात. मायभूमीपासून लांब असताना या सणाचे महत्व प्रकर्षाने जाणवते. या सणाच्या निमित्ताने मराठी वेशभूषा, पदार्थ, व्रतवैकल्य सगळे अतिशय तन्मयतेने केले जाते. ढोल ताशांच्या गजरात गणेशोत्सव साजरा होतो. नऊवारी साडीपासून नथीपर्यंत सगळे हौसेने घातले जाते. श्रीखंड पुरी, पुरणपोळी, मोदक सगळे केले जाते. शिवजयंती, भारताचा स्वातंत्र्यदिन सुद्धा साजरा होतो. आई बाबांच्या मदतीने का होईना मुले शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळकांपासून संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपर्यंत सगळ्याची माहिती करून घेतात. या सगळ्यात आपली संस्कृती, पेहेराव, पदार्थ, म्हणजे थोडक्यात आपला अभिमान उठून दिसतो आणि तो कळत नकळत पुढच्या पिढीपर्यंत पोचतो सुद्धा.

कालांतराने आम्ही इथे मराठी शाळा सुरु केली. शाळेच्या निमित्ताने मराठी भाषेबद्दल आत्मीयता असणारी शिक्षक मंडळी भेटली. शाळा सुरु केली आणि मग खरी गंमत सुरु झाली. त्या निमित्ताने मुलांना मराठी लिहायला, वाचायला, ऐकायला शिकवणे सुरु झाले. खरंतर माझा पिंड अजिबात शिक्षकाचा नाही. पण आपल्याला कळलेल्या किंवा आवडलेल्या मराठीचा निदान दहा टक्के भाग तरी आपल्या मुलांपर्यंत पोचावा या हेतूने शाळेत शिक्षिका व्हायला होकार दिला. मराठी शाळेत शिकवताना असंख्य गोष्टी जाणवत गेल्या. सगळ्यात आधी अवघड वाटले मुलांच्या का मराठी शिकायचे या प्रश्नाचे उत्तर शोधणे. ग्रीन बे, विस्कॉन्सिन सारख्या ठिकाणी जिथे सगळी मिळून फारतर वीस पंचवीस मराठी कुटुंब आहेत तिथे या मुलांना मुद्दामून मराठीचे महत्व कसे पटवायचे. मग त्यात मुलांना मातृभाषा म्हणून मराठीचे महत्व समजावून सांगणे गरजेचे वाटले. मातृभाषा आपली संस्कृती, इतिहास आणि वारसा समजून घेण्यासाठी पाया म्हणून काम करते. यामध्ये " कुठे तुझा जन्म झाला, कुठे तुझे मूळ समजून घेणे याचा सगळ्यात महत्वाचा वाटा आहे. यात मराठी न आल्यामुळे आपण काय गमावू याची जाणीव करून देणे जास्त महत्वाचे असतेच. मराठी नीट बोलता आल्यामुळे भारतात राहणाऱ्या आजी आजोबांशी, भावंडांशी छान गप्पा मारता येतात, जोडणारे दुवे सापडतात हे लक्षात आले आणि मग त्यातही गंमत वाटायला लागली.

पण हा भाग फक्त मराठी बोलण्याचा. खरी परीक्षा सुरु होते ते मराठी लिहायला किंवा वाचायला शिकवताना. देवनागरी लिपीत लिहिताना मुलांची होणारी तारांबळ बघितली आणि मीच पुन्हा मराठीचा नव्याने अभ्यास करायला घेतला आणि तिच्यातले खाचखळगे आणि गमती जमती दिसायला लागल्या. इंग्लिश प्रथम भाषा असणाऱ्या या मुलांना मुळाक्षरे, बाराखडी शिकवण्यापासून याची सुरुवात होते. मग हळू हळू, शब्द, वाक्य, वाक्यरचना याची सुरुवात होते. यात ध्वनी मधले फरक, उच्चारातले फरक समजावून सांगताना असंख्य कोलांट्या मारल्या जातात. त्यांना चमचा मधला च आणि चहा मधला च किंवा जहाज मधला ज आणि जंगल मधला ज याचा उच्चार वेगळा कसा अशासारखे प्रश्न पडतात. पुढचा मोठ्ठा खड्डा म्हणजे लिंग आणि वचन. सगळ्या निर्जीव गोष्टींना Neuter gender असे शिकलेल्या मुलांना मराठीत अंगठी "ती" असते किंवा तलाव "तो " असतो असे शिकवल्यावर गोंधळ व्हायला लागतो. नाम किंवा सर्वनाम त्या मानाने सोपे. पण मग नामाप्रमाणे किंवा लिंग वचनाप्रमाणे क्रियापदे आणि वाक्यरचना बदलतात. तो गातो, ती गाते, ते गातात असे बदल होतात. दार लाव म्हणजे shut the door आणि दिवा लाव म्हणजे switch on the light. म्हणजे लाव हे एकच क्रियापद किती वेगवेगळ्या अर्थांनी वापरतो आपण. पुढचा भाग भाषांतराचा. "On the bus" चे भाषांतर "बस वर" असे केले जाते. मग "बस वर" आणि "बस मधे" यातला फरक समजावून सांगावा लागतो. She plays piano या मधला "plays" म्हणजे "वाजवते" आणि He plays cricket मधला "plays म्हणजे "खेळतो" अशी गडबड होते. इंग्रजीत नातेवाईक सरसकट uncle, aunt किंवा cousins असतात तेच नातेवाईक मराठीच आले की काका, मामा, आत्या, मावशी, चुलत, आते किंवा मावस भावंडं होतात. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. या सगळ्यात प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे मराठी भाषा पान क्रमांक २ ओळ क्रमांक २० अशी शिकवताच येत नाही. व्याकरणाच्या पलीकडे जाऊन आसपासची भौगोलिक परिस्थिती, वातावरण समजून घेऊन मगच मराठी भाषा शिकवता येते.

श्रवणाचा मराठी भाषेच्या जाणिवेत खूप मोठा भाग आहे. आपण जे ऐकतो त्याचा भाषा समृद्ध होण्यासाठी फार मोठा वाटा आहे. आजी आजोबांच्या आवाजात ऐकलेली गोष्ट आयुष्यभर मनात घर करून राहते. न कळत्या वयात अर्थही न समजता फक्त ऐकून शिकलेली स्तोत्रे, प्रार्थना कधीच विसरत नाहीत. audio cassettes च्या पिढीतल्या माझ्याकडे असंख्य गोष्टींच्या cassettes होत्या. बाबासाहेब पुरंदर्यांच्या शिवाजी महाराजांच्या गोष्टींपासून अगदी मंगला गोडबोल्यांनी सांगितलेल्या छान छान गोष्टींपर्यंत सगळ्या माझ्याकडे होत्या. या सगळ्याची मुलीला निदान ओळख व्हावी असे खूप वाटायचे. यात परदेशात असताना एक मोठी उणीव जाणवली म्हणजे मराठी साहित्य परदेशात सहज उपलब्ध होतच नाही. त्यातही जेवढे शक्य आहे तेवढे उपलब्ध करायचा प्रयत्न केलाच. Storytel, YouTube नी खूप मदत केली. माझे अतिशय आवडते फास्टर फेणे, बोक्या सातबंडे मुलीला ऐकवायला घेतले. तिनेही ते ऐकले, पण मला आवडले होते तेवढे काही तिला आवडले नाहीत. मग मी कारणे शोधायला लागले आणि बऱ्याच गोष्टी जाणवत गेल्या. एकतर या गोष्टी तिच्या पिढीच्या मानाने बऱ्याच जुन्या. वापरलेले शब्द त्यामानाने बरेच जुने किंवा भारतातल्या भौगोलिक परिस्थितीशी संबंधित. या सगळ्याची सांगड घालण्यात बराच वेळ गेला. माझ्यासाठी लहानपणी फास्टर फेणे सुपरहिरो होता. तो काहीही करू शकेल असे वाटायचं. पण तिला असे काहीच वाटेना. बरोबर आहे. Electronics आणि Devices ची सवय असणाऱ्या या नव्या पिढीला धडपड्या फास्टर फेणे relatable कसा वाटणार. पण दिलीप प्रभावळकरांच्या बोक्या सातबंडे नी धमाल उडवून दिली होती. या गोष्टी मी मुलांना वाचून दाखवायचे, आणि बरोब्बर अश्या ठिकाणी थांबवायचे की पुढच्या रविवारी मुले आधी पुढची गोष्ट सांग मग बाकीचे बघू म्हणायची.

लहानपणापासून मला वाचनाची अतिशय आवड. हीच आवड माझ्या मुलीमधे ही उतरली आहे. पण तिच्या आणि माझ्या वाचनाच्या आवडी खूपच भिन्न आहेत. तिच्या वाचनाची सुरवात माझ्यासारखी मराठी पुस्तकांपासून झाली नाही. परदेशस्थ बहुतांश मुलांसारखी तिने वाचनाची सुरुवात इंग्रजी पुस्तकांपासूनच केलीय. ती पुस्तके तिला परदेशात मुबलक उपलब्ध होती. तिला हव्या त्या विषयावरची इंग्रजी पुस्तके तिला मिळत होती. मराठी वाचायला अवघड जाते म्हणून वाचायचा कंटाळा करणाऱ्या माझ्या मुलीला किंवा विद्यार्थ्यांना काय वाचायला द्यावे म्हणजे मनोरंजक वाटेल असा विचार करायला घेतला. पण दुर्दैवाने असे जाणवले की या मुलांना आपले वाटेल किंवा त्यांच्या इंग्रजी साहित्याशी जवळचे वाटेल असे खूप वाचन साहित्य मला मिळतच नाहीये. हा कदाचित माझाच दोष असेल. पण या मुलांच्या Harry Potter, Spy School, Keeper of the Lost Cities सारखी पुस्तके अजूनतरी मला मराठीत मिळालेली नाहीत. यात एक गोष्ट खूप महत्वाची वाटते की या मुलांचे कल्पनाविश्व बरेचसे वास्तववादी आहे. परीकथांपासून ही मुले बरीच पुढे आलेली आहेत. मराठी वाचनाचा सराव व्हायला खूप वाचायला पाहिजे हे कळते पण या मुलांना काय वाचायला द्यावे म्हणजे त्यांना कंटाळा येणार नाही

हा प्रश्नच पडतो मला. पण तरीही अकबर बिरबल म्हणा, भा रा भागवतांची पुस्तके म्हणा मदतीला येतातच. सध्या इंस्टाग्रामवर chintoo_toon ह्या पानावर चिंटूची चित्रकथा प्रकाशित केली जाते ती पण खूप आवडते या मुलांना. अजून शोध चालू आहे. सापडेलच काही ना काहीतरी.

असे थोडेसे खाचखळगे असेल तरीही मराठी सारखी समृद्ध भाषा परदेशातही टिकून राहावी असे मनापासून वाटत राहते. आपापल्या परीने सगळेच त्यासाठी प्रयत्न करत असतोच आपण. मराठी भाषा संवर्धित करायची म्हणजे प्रत्यक्षात काय करायचे, तर पहिली गोष्ट म्हणजे आपली भाषा हिरीरीने बोलायची आणि मराठी येणाऱ्या प्रत्येकाला हट्टाने बोलायला लावायची. इंटरनेट च्या माध्यमातून एक अलिबाबाची गुहाच उघडली आहे आपल्यासाठी. अश्यावेळी भाषा संवर्धनासाठी फक्त जुन्याला चिकटून न बसता अद्ययावत होणे आपल्याच हातात आहे. शेवटी काय हो, देशात काय किंवा परदेशात काय अमृतातेही पैजा जिंकणारी तुमची आमची सगळ्यांची मराठी आपले अस्तित्व आहे आणि अभिमानही.

धर्म, पंथ, जात, मराठी जाणणारा, एवढ्या जगात माय मानतो मराठी

- शीतल शेणवाई, नॉर्थईस्ट विस्कॉन्सिन मराठी शाळा

संकल्पना : गौतम पंगू रेखाटन: विनिता वेल्हाळ

पिकलं पान

पिकलं पान गळून पडणार
त्याचं तरी कोण ऐकणार?
पिकलं पान दिसतंच पिवळं
बाकीच्यांना त्याचं सोवळं
वेगळं वेगळं नंतर पूर्णच वेगळं
मग त्याचं कसं कोण ऐकणार?
पिकलं पान गळून पडणार
फांदी बंद करेल त्यास रसार्पण
होतील कृश तयाचे देठ जीर्ण
दृढ होता एके काळचा तरुण
आता त्याचे कोण ऐकणार?
पिकलं पान गळून पडणार
कधी वाऱ्याचा यमदूत येईल
कापून नाळ कुठे दूर नेईल
जीवाची परमसत्यकथा होईल
पण मस्तीत मग्न कोण ऐकणार?
पिकलं पान गळून पडणार
या जीवनचक्रात मग्न सर्वच
हिरवे कधीतरी पिवळे होईलच
रंगबदल हे ज्ञान शहाणपणाचं
ते सांगणार पण कोण ऐकणार
की पिकलं पान गळून पडणार

- ज्योत्स्ना काटकर नारनवरे, केंडल पार्क , न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



पुरुषोत्तम पुरस्कार

सांगली येथील कै. जयंती वासुदेव गाडगीळ विश्वस्त निधीतर्फे दर वर्षी काही मराठी संस्कृत पंडितांचा सत्कार केला जातो. आत्तापर्यंत सांगली, वाई, सातारा, रत्नागिरी, पुणे, नाशिक, बनारस वगैरे ठिकाणच्या एकूण शंभरहून अधिक मराठी संस्कृत पंडितांचा सत्कार केला आहे. विश्वस्थ निधीचे संस्थापक कै. श्री. हरिभाऊ वासुदेव गाडगीळ यांच्या जन्मशताब्दीनिमित्त श्री. गणेश हरि गाडगीळ आणि श्रीमती माधुरी बापट यांनी उत्तर अमेरिकेतील काही मराठी संस्कृत पंडितांचा सत्कार करण्याचे आयोजित केले आहे.

त्याप्रमाणे २२ सप्टेंबर २०२४ या दिवशी लेक्सिंग्टन, केंटकी येथे डॉ. अविनाश साठये यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. साठये हे संस्कृत व गणित या दोन्ही विषयात पारंगत आहेत. पं. वसंतराव गाडगीळ यांच्याकडे त्यांचे संस्कृतचे अध्ययन झाले. एस. पी. कॉलेज पुणे इथून त्यांची गणितात बी. एस सी. मिळवली. पर्डू युनिव्हर्सिटीची त्यांची गणितातली पीएच. डी. असून भास्कराचार्यांच्या 'सिद्धांत शिरोमणी', आर्यभटाच्या 'आर्यभटीय' व उपनिषदांचे गाढे अभ्यासक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ केंटकीमधे त्यांनी 'भारतातील पुरातन गणित' यावर अभ्यासक्रमही शिकवला. अनिता गांगल तसेच संजीव व हिमानी पटवर्धन यांची यावेळी खूपच मदत झाली. स्नेही व नातेवाईक अशा १५ जणांच्या उपस्थितीत कार्यक्रम छोटा व अनौपचारिक असा झाला.

१ जून २०२५ या दिवशी सनीव्हेल, कॅलिफोर्निया येथे डॉ. माधव देशपांडे (एमरिटस, युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगन, ॲन आर्बर , मिशिगन) यांचा सत्कार संपन्न झाला. वयाच्या पाचव्या वर्षापासून पुण्याच्या टिळक महाविद्यालयात त्यांनी संस्कृतचे अध्ययन केले. एस. एस. सी. परिक्षेत जगन्नाथ शंकरशेट मिळवली. फर्ग्युसन कॅलेजमधून बी.ए., पुणे विद्यापिठातून एम. ए. व युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्वेनियातून पीएच. डी. मिळवली. सेवानिवृत्तीनंतरही गेली ७-८ वर्षे ते न चुकता रोज सकाळी ६ वाजता फेसबुकवर श्रीकृष्णावर संस्कृतमधे चार ओळी काव्य व त्याचे मराठी व इंग्रजीतील रुपांतर लिहितात. या कार्यक्रमाची माहिती त्यांनी संस्कृतमधे लिहून दिल्लीच्या संस्कृत नियतकालिकात प्रसिद्ध केली. या कार्यक्रमाचे संयोजन करण्यात क्यूपर्टीनोचे डॉ. मंदार व डॉ. अश्विनी देशपांडे यांचे खूप सहकार्य झाले. तसेच सारंग देशपांडे याने फोटो, व्हिडिओ याची जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमास त्यांचे नातेवाईक व स्नेही असे ४५ जण उपस्थित होते.

८ जून २०२५ या दिवशी बिर्याणी भाई, रिचमंड, कॅनडा येथे डॉ. अशोक अकलूजकर (एमरिटस, युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिटिश कलंबिया, कॅनडा) व डॉ. अधीश साठये (असोसिएट प्रोफेसर, युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिटिश कलंबिया, कॅनडा) यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अकलूजकर हे पण मुळचे पुण्याचे. स.प. महाविद्यालयातून त्यांनी बी.ए. मिळवली. पुणे विद्यापिठातून एम. ए. व हार्वर्ड, यू. एस. ए. मधून पीएच. डी. मिळवली. सत्काराला उत्तर देतांना ते पंधरा मिनीटे संस्कृतमधून बोलले व आपल्या गुरूंना अभिवादन केले. 'भारताबाहेरील संस्कृत पंडित' असा मान पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांना दिला आहे. कार्यक्रमाला त्याचे नातेवाईक व स्नेही असे एकूण ५५ लोक उपस्थित होते.

डॉ. अधीश साठये मूळचे लेक्सिंग्टन, केंटकीचे. भारताबाहेर जन्मले व वाढले असूनही संस्कृतची त्यांना जन्मजात आवड व आकर्षण आहे. 'विश्वामित्र ऋषी' यावर त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. या कार्यक्रमासाठी आकांक्षा म्हैसकर, डॉ. अतुल गोखले व प्रगती नाडकर्णी यांची मदत झाली.

चौघांनाही हार, मानपत्रे, शाली, चांदीचे नारळ (त्यात थोडी रक्कम) व ज्याच्या त्याच्या श्रद्धास्थानांच्या चांदीच्या मूर्ती देण्यात आल्या.

- **माधुरी बापट,** मॉर्गटाऊन, वेस्ट व्हर्जिनिया

श्रद्धांजली



सार्वजनिक स्थपति पांडुरंग दत्तात्रय, 'प्रकाश' येरवडेकर (१९४०-२०२५)

न्यू यॉर्क राज्याच्या एकत्रित न्यायव्यवस्थेचे पहिले प्रमुख स्थपति 'मिस्टर प्रकाश' म्हणून राज्यात सगळीकडे ओळखले जाणारे पांडुरंग दत्तात्रय येरवडेकर, जुलै १८ रोजी वॉशिंग्टन डीसीमध्ये निधन पावले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात् त्यांच्या पत्नी सुषमा, दोन पुत्र समीर अणि निखिल तसेच एक स्नुषा आणि एक नात असा परिवार आहे.

न्यू यॉर्क सिटी बार ॲसोसिएशनचा न्यायालय-प्रशासनातील लक्षणीय योगदानाप्रीत्यर्थ देण्यात येणारा 'बर्नार्ड बोटीन अवॉर्ड' हा बहुमान मिळालेले ते पहिले स्थपति (Architect) होत.

'सार्वजनिक स्थपति' म्हणून त्यांना गौरविताना अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस, न्यू यॉर्क चॅप्टरने म्हटले, "देशातील सर्वात मोठा राज्यव्यापी न्यायप्रकल्प, न्यू यॉर्क राज्यन्यायालय वास्तुप्रकल्प निर्माण करण्यात त्यांनी अग्रेसर भूमिका बजावली. श्री. येरवडेकर स्थापत्य आणि नागरी संकल्पन यांच्या अव्वल दर्जामुळे जनतेला होणाऱ्या लाभांचे अथक पुरस्कर्ते आहेत आणि त्यांना न्यायालयवास्तूंच्या लोकशाहीतील सहभागाच्या महत्त्वाची प्रखर जाणीव आहे. त्यांची संकल्पनातील तपशीलांवर असलेली निष्ठा आणि सजग दूरदृष्टी यांनी न्यू यॉर्क राज्यातील भावी पिढ्यांसाठी वारसा निर्माण केला आहे."

सोसायटी ऑफ इंडोअमेरिकन एंजिनियर्स ॲण्ड आर्किटेक्टसने त्यांच्या कार्याचा 'आर्किटेक्ट ऑफ द यिअर' या सन्मानाने गौरव केला.

न्यू यॉर्कमधील बीकन सिटीच्या महापौरांना त्यांनी इतर दोनतीन लहान गावांसह एक कर्जरोखा काढावा म्हणजे व्याजाचा दर माफक राहील अशी सूचना केली, ती त्यांना अतिशय भावली.

त्यांची उत्स्फूर्त, विनोदी वक्तृत्वशैली अद्वितीय होती.

त्यांच्या सुंदर हस्ताक्षरामुळे त्यांना आपली लग्नपत्रिका हाताने लिहून देण्याची विनंती एका सहकारिणीने केली तर दुसरीने तिच्या आईवडिलांच्या लग्नाच्या वाढदिवसाच्या पत्रिकेसाठी. त्यांनी ती आनंदाने मानली.

जन्मजात पुणेकर प्रकाश येरवडेकर सर्व परीक्षा उत्कृष्ट रीत्या पार करीत, बरेच वेळा पहिलेच येत असत. त्यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ॲण्ड आर्किटेक्चरमध्ये स्थापत्याचा अभ्यास केला, मुंबई विद्यापीठाच्या बॅचलर ऑफ आर्किटेक्चर परीक्षेत ते पहिले आले.

मुंबईच्या बाजपायी मदन पत्की ॲण्ड राजधन या स्थापत्य मंडळीत काही काळ काम केल्यावर ते इंग्लंडला गेले आणि त्यांनी लंडनच्या जेम्स डी. शियरर आर्किटेक्टस यांच्याकडे काम केले. पुढे ते मास्टर ऑफ आर्किटेक्चर ही पदवी मिळवण्यासाठी युनिव्हर्सिटी ऑफ लिव्हरपूलला गेले. या पदवीसाठी त्यांनी लिहिलेल्या पूर्वरचित वास्तूंवरच्या प्रबंधाला ग्रंथालयात मोठी मागणी होती. नंतर ते आर्किटेक्चरमध्ये डॉक्टरेट करण्यासाठी प्रोफेसर डिक्स यांच्याकडे युनिव्हर्सिटी ऑफ नॉटिंगहमला गेले असते पण त्यांचे इंग्लिश मित्र नशीब काढण्यासाठी कॉमनवेल्थमधील इतर देशात जात होते, त्यांच्या आग्रहामुळे प्रकाश येरवडेकरांनीसुध्दा इंग्लंड सोडण्याचे ठरवले. मात्र कॉमनवेल्थमधील इतर देशांपेक्षा त्यांनी अमेरिका पसंत केली.

विदेशी मराठी बांधवांसाठी विशेष म्हणजे 'एकोपा'च्या वाचकांना त्यांचे 'सांगायची गोष्ट' हे सदर आणि त्यांनी निर्मिलेले 'एकोपा'चे कल्पक बोधचिन्ह परिचयाचे आहे. मुलांना घरीच मराठी लिहितां यावे यासाठी मी लिहिलेले 'मराठीचा श्रीगणेशा' हे पुस्तक त्यांच्या अप्रतिम मराठी आणि इंग्लिश हस्ताक्षराने सजले आहे.

महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्कमध्ये अध्यक्ष आनंद जोशी यांनी 'संगीत साष्टांग नमस्कार' बसवले तेव्हा संभाव्य नटांची चाचणी घेतली आणि 'तुम्हाला बहुतेक दोनतीन ओळींचीच भूमिका करावी लागेल' असे आधी सांगितले, प्रत्यक्षात संपूर्ण पुस्तक पाठ करावे लागेल अशी रावबहाद्दुरांची भूमिका वाट्याला आली, ती प्रकाश येरवडेकरांनी अशी दिमाखात केली की जणू काही ते हे रोजच करतायत !

नाटकासाठी काढलेली उत्कृष्ट कार्यक्रमपत्रिका त्यांच्या हस्ताक्षराने आणि पात्रपरिचयासाठी काढलेल्या चित्रांनी उठावदार झाली होती.

- सुषमा येरवडेकर,



Scan the QR code to Register Now →
Or Register: https://forms.gle/1Fw8Qsvr3K27dzq9A

Proud to Be Marathi. Bold Enough to Build Wealth Together.

Introducing the Global Marathi Investor Group (GMIG)

(Sponsored By)

FICON LAB+FUND

Use Venture / PE to create generational wealth
Learn how seasoned Marathi professionals build startups

FICON LAB+FUND – A startup ecosystem builder
Delivering … What investors want. What founders need. What markets demand.
Explore our story at https://www.ficonlabfund.com

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.

On July 26th we had Show and Tell meeting in our Art group MANA

Show and tell meeting: This is a way of connecting with other Marathi artists in our group to show our work, learn from each other and enhance our skills. In a typical meeting, we organize an accomplished guest artist for either demo or talk. In addition, each participating artist shows their painting and receives feedback on it. This helps us get better in our art practice.

For the demo artist for this meeting, we had Shri Ashok Hinge, who is a very accomplished calligraphy artist.

As part of his demo, he started with showing us writing very basic Devanagari alphabets. I was surprised to know that there is a structure to writing the alphabet for a beginner artist. Once the basic alphabets and phrases are practiced, one can advance to writing stylized phrases. The stylized writing shows an artist's creativity and one can start recognizing their style. Of course it may take long to get to that stage of stylized calligraphy writing, where drawing lines and shapes of these alphabets becomes second nature! But he made it look so easy !!

In conclusion, it was a very wonderful presentation and all our artists thoroughly enjoyed it and came out with ideas of how they can enhance their art using calligraphy skills.

Juried MANA Artist Winners			
1st Place	**2nd Place**	**3rd Place**	**3rd Place**
 Leena Sathe Joshi **Title:** Blue hue **Size:** 16x20 in **Medium:** Acrylic	 **Alpana Dhond** **Title:** Red Rock Radiance **Size:** 12x16 in **Medium:** Soft Pastels	 **Prerana Kulkarni** **Title:** Betty Boop Duet **Size:** 11x15 in **Medium:** Watercolor	 **Mrunalini Chavarkar** **Title:** Story of six yards **Size:** 11x14 in **Medium:** Oil

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.

Interim Financial Report: January 1 – June 30, 2025

Dear All,
Please find below the interim financial highlights for the period from January 1 to June 30, 2025.

Key Notes:
- The Profit & Loss reports provide initiative-wise income and expense breakdowns for all BMM programs.
- We successfully conducted five distinct courses during this period.
- Student participation has increased by 60% compared to the same period in 2024.
- The BMM Summer Yuva Mentorship Program is progressing successfully.
- Our programming team successfully executed four India-based initiatives.
- The BMM Committee collaborated with the Dallas and Cleveland teams to ensure the smooth execution of *Maitryee Melawa*.
- *Reshimgathi* – the NJ Meetup in partnership with Marathi Vishwa – was held on July 12 and was a great success.

These accomplishments were only possible due to the unwavering support of our dedicated volunteers and partner mandals. We sincerely thank everyone for their wholehearted contributions.

Warm regards,
Santosh Salvi
BMM Treasurer

Balance Sheet

Accrual Basis — As of June 30, 2025

	Jun 30, 25
Current Assets	
Checking/Savings	
BANK OF AMERICA - SAVING # 6828	50,044.36
BANK OF AMERICA # 6287	100.00
BANK OF AMERICA CHK - # 4341	156,570.84
PAYPAL	17,301.50
Zeffy US	4,950.00
Total Checking/Savings	228,966.70
Other Current Assets	
COMMONWEALTH FINANCIAL NETWORK	702,747.03
Total Other Current Assets	702,747.03
Total Current Assets	931,713.73
Other Assets	
SEED MONEY SEATTLE	20,000.00
SF SEED MONEY RECEIVABLE	15,000.00
Total Other Assets	35,000.00
TOTAL ASSETS	966,713.73
LIABILITIES & EQUITY	
Equity	
GENERAL FUND	222,245.80
Opening Bal Equity	8,370.17
Retained Earnings	602,147.57
Net Income	133,950.19
Total Equity	966,713.73
TOTAL LIABILITIES & EQUITY	966,713.73
ADVERTISEMENT INCOME	94.00

BMM Courses & Initiatives	
Kirtan	2,050.00
Marathi Bolibhasha	1,750.00
Sanskrit Class	150.00
Shastriya Sangeet	185.00
Sugam Sangeet	1,840.00
Total BMM Courses & Initiatives	5,975.00
BMM Marathi Yuwa Summer Mentori	4,050.00
BMM Samajrang	0.00
DONATION	11,044.53
INDIA PROGRAMMING	
Dhanashree Lele Program	17,000.00
Dharohar	25,923.26
Indradhanu	5,740.00
Jar Tar Chi Gosta	23,045.27
Shikayala Gelo Ek	12,000.00
INDIA PROGRAMMING - Other	22,335.80
Total INDIA PROGRAMMING	106,044.33
INTEREST INCOME	8.29
MARATHI MOVIE	
Fussclass Dabhade	2,025.00
Mukkampost Bombilwadi	575.00
Total MARATHI MOVIE	2,600.00
MARATHI SHALA EXAM FEES & BOOKS	73,343.59
Marathi Shala Online course	2,430.00
Membership	5,750.00
PAUROHITYA	6,925.00
Reshimgathee	
Meetup NJ	14,890.00
Reshimgathee - Other	10,740.00
Total Reshimgathee	25,630.00
SUSPENSES - INCOME	150.00
VRUTTA	
NEWS LETTER-ADV	400.00
VRUTTA MEMBERSHIP	475.00
Total VRUTTA	875.00
Total Income	244,919.74
Expense	
BANK SERVICE CHARGES	379.02
COMPUTER EXPENSES	374.88
Donation Exp	0.00
DUES AND SUBSCRIPTION	1,487.61
INDIA PROGRAMMING EXPS	
Dhanashree Lele Program	13,491.24
Dharohar	13,045.12
Indradhanu	5,740.00
Jar Tar Chi Goshta	37,414.26
Total INDIA PROGRAMMING EXPS	69,690.62
INSURANCE	1,182.58

Profit & Loss
January through June 2025

	Jan - Jun 25
MAITRI MELAWA	
EXPENSE DALLAS FORT	23,789.22
Total MAITRI MELAWA EXPENSE	23,789.22
MARATHI MOVIE EXPENSE	
Fussclass Dabhade	2,050.00
Mukkampost Bombilwadi	3,825.00
Total MARATHI MOVIE EXPENSE	5,875.00
MARATHI SHALA EXPS	3,955.00
MISC. EXPS	273.42
PAUROHITYA EXP	3,075.00
WEBSITE EXPENSE	887.00
Total Expense	110,969.55
Net Ordinary Income	133,950.19
Net Income	133,950.19